## आजचे पंचांग

शनिवार, दि. ३० मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, शुक्लपक्ष, चतुर्दशी सकाळी ११-५८ पर्यंत नंतर पौर्णिमा तिथी, दिवस नक्षत्र– विशाखा दुपारी १-२१ पर्यंत नंतर अनुराधा, चंद्र रास - तुला सकाळी ६-३९ पर्यंत नंतर वृश्चिक, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

## खाऊ गल्ल्या रात्री बंद

**पुणे :** शहरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पुणे शहर पोलिस आयुक्तांनी रात्री १० नंतर खाऊ गल्ल्या बंद करण्याचे आदेश दिल्याने शहरात त्याचे उलट सुलट पडसाद उमटू लागले आहेत. या आदेशाच्या अंमलबजावणीने रात्रीच्या वेळी शहरातील फुटपाथवर होणारी गर्दी कमी झाली असून रहिवाशांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. तर रास्त दरात खाद्यपदार्थ पुरविणाऱ्या खाऊ गल्ल्या बंद झाल्याने विद्यार्थी व परगावहून येणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय झाली आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. ३० मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २४४ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### मालमत्तेच्या वादातून कर्नाटकात सहा ठार

**विजयपुरा :** कर्नाटकतील विजयपुरा जिल्ह्यात शुक्रवारी एकाच कुटुंबातील पाच सदस्यांसह सहा जणांची हत्या झाल्याने मालमत्ता वादाने गंभीर वळण घेतले. जिल्ह्यातील चडाचना तालुक्यातील गोविंदपुरा गावात ही घटना घडली. मृतांपैकी पाच जण एकाच कुटुंबातील होते, अशी माहिती पोलिसांनी दिली.

### पद्मनाभस्वामी मंदिराने आरोप फेटाळला

**तिरुवनंतपुरम :** श्री पद्मनाभस्वामी मंदिराच्या प्रशासकीय समितीने शुक्रवारी प्रसिद्ध मंदिरात मौल्यवान वस्तू हरवल्याचा आणि सुरक्षेत त्रुटी असल्याचा आरोप करणारा पोलिस अहवाल फेटाळून लावला आणि ते तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली. समितीने म्हटले आहे की, सविस्तर अंतर्गत पडताळणीत असे आढळले आहे की पोलिस अहवालात "गहाळ झालेल्या" म्हणून वर्णन केलेले हिऱ्याचे दागिने "गर्भगृहात सुरक्षितपणे ठेवले गेले होते". मंदिराच्या कार्यकारी अधिकाऱ्याने सादर केलेल्या अहवालात, दागिने, दिवे आणि यादी नोंदींच्या तपासणीनंतर याची पुष्टी झाली आहे.

### राजधानी दिल्लीत पावसाने दिलासा

**नवी दिल्ली :** दिल्लीत गेल्या ४८ तासांत ९.४ अंश सेल्सिअसपर्यंत तापमानात घट नोंदली गेली. शहरात पाऊस कोसळल्याने, दिल्लीकरांना दिलासा मिळाला. शुक्रवारी शहराचे कमाल तापमान ३६.८ अंश सेल्सिअस होते, जे ८ मे नंतरचे सर्वात कमी तापमान ठरले. दरम्यानच्या २१ दिवसांत, पारा सातत्याने वाढत पारा ४५ अंश सेल्सिअसपेक्षा वर गेला.

### पोलिसांचे अपयश उघड, फुगेवाडी-हडपसरमध्ये १५ मृत्यूंनी खळबळ

# पुणे-पिंपरीत विषारी दारूचा कहर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या काही दिवसांपासून वाढत्या गुन्हेगारी घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असतानाच आता विषारी दारूमुळे झालेल्या मृत्यूंच्या मालिकेने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

बेकायदेशीर दारू विक्री, स्थानिक पातळीवरील गुन्हेगारी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यात पोलिसांना आलेले अपयश पुन्हा एकदा उघड झाले असून, फुगेवाडी, हडपसर आणि काळेपडळ परिसरात अवघ्या काही तासांत १५ जणांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण पुणे हादरले आहे.



फुगेवाडी येथे गुरुवारी सात जणांचा संशयास्पद मृत्यू झाल्यानंतर सुरुवातीला विषारी दारूचा संशय व्यक्त करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी स्पष्ट केले की मृतांपैकी चार जणांचा मृत्यू विषारी दारू पिल्याने झाला आहे. या प्रकरणी पाच जणांना ताब्यात घेण्यात आले असून, आणखी तीन आरोपी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ताब्यात असल्याची माहिती समोर आली आहे.

मृत्यू झालेल्या सर्व व्यक्तींनी गावठी दारूचे सेवन केल्याचा प्राथमिक संशय व्यक्त करण्यात येत आहे. फुगेवाडीतील मृतांमध्ये दोन सख्ख्या भावांचा समावेश असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. एका भावाच्या मृत्यूचा तीव्र मानसिक धक्का बसल्याने दुसऱ्या भावाचाही मृत्यू झाल्याचे त्यांच्या वडिलांनी सांगितले. या घटनेमुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील अवैध दारू व्यवसायाचे जाळे पुन्हा एकदा उघडकीस आले आहे.

शहरात खुलेआम सुरू असलेल्या हातभट्टी दारू विक्रीकडे दुर्लक्ष का झाले, याबाबत पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. स्थानिक पातळीवरील गुन्हेगारी आणि अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्यात यंत्रणा अपयशी ठरत असल्याची टीकाही होत आहे.

प्राथमिक तपासात केमिकलयुक्त स्पिरिटपासून अत्यंत घातक गावठी दारू तयार करण्यात आल्याचे उघड झाले आहे. ही दारू प्लास्टिकच्या फुग्यांमध्ये भरून फुगेवाडीसह हडपसर भागात विक्रीसाठी पाठवण्यात आली होती. या दारूचे सेवन केल्यानंतर संबंधित नागरिकांना उलट्या, तीव्र पोटदुखी आणि अस्वस्थतेचा त्रास सुरू झाला. प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या संपूर्ण प्रकरणामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील बेकायदेशीर दारू व्यवसाय, स्थानिक पोलिसांची कार्यपद्धती आणि गुन्हेगारी नियंत्रणाच्या यंत्रणेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

### मुख्यमंत्र्यांकडून गंभीर दखल

● मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. विषारी दारूमुळे १४ जणांचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करत त्यांनी पोलिसांना कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत. "याप्रकरणी आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली असून आणखी काही जणांना अटक होऊ शकते. कोणाचीही गय करू नका," असे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत.

# महाविकास आघाडीचे जागावाटप अखेर ठरले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** आगामी विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाला आहे. आघाडीच्या नेत्यांची झालेली महत्त्वाची बैठक पार पडल्यानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जागावाटपाची माहिती जाहीर केली.

आघाडीने १७ जागांवर एकमत साधले असून सर्व जागांवर एकत्रितपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख १ जून २०२६ आहे. जागावाटपाच्या सूत्रानुसार काँग्रेसला सर्वाधिक ८ जागा मिळाल्या आहेत. उबाठाला ६, तर शरद पवार गटाला ३ जागा देण्यात आल्या आहेत. काँग्रेसच्या वाट्याला चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा, अमरावती, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव आणि नागपूर पोटनिवडणुकीची जागा आली आहे. उबाठाला रायगड, जळगाव, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर, नांदेड आणि नाशिक या जागा देण्यात आल्या आहेत. तर शरद पवार गट पुणे, ठाणे आणि सांगली-सातारा या तीन जागांवर उमेदवार देणार आहे.

सपकाळ यांनी महायुतीवर टीका केली. "राज्यात भाजपचे 'पैसा फेक तमाशा देख' सुरू आहे. पाच लाख रुपये अॅडव्हान्स देऊन नगरसेवक पळवले जात आहेत. देवेंद्र फडणवीस हे व्होट चोरीच्या माध्यमातून मुख्यमंत्री झाले असून पैसा फेकून निवडणुका लढत आहेत. 'बाप बडा ना भैया, सबसे बडा रुपय्या' अशी त्यांची अवस्था झाली आहे," असा आरोप त्यांनी केला.

# खरात प्रकरणातील एसआयटी बरखास्त?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** गेल्या दोन महिन्यांपासून राज्यभर गाजत असलेल्या अशोक खरात प्रकरणाची पुन्हा एकदा जोरदार चर्चा सुरू झाली आहे. प्रकरण शांत होत असल्याचे चित्र निर्माण झाले असतानाच अंजली दमानिया यांनी केलेल्या दाव्यांमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. खरात प्रकरणाच्या तपासासाठी स्थापन करण्यात आलेली विशेष तपास समिती बरखास्त करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला असून, यामुळे तपास दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

माध्यमांशी संवाद साधताना अंजली दमानिया यांनी सरकारच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. दोन महिने उलटून गेल्यानंतरही या प्रकरणातील महत्त्वाच्या राजकीय व्यक्तींची चौकशी नेमकी कुठपर्यंत पोहोचली, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नसल्याचे त्यांनी म्हटले. अशातच एसआयटी बरखास्त झाल्याची माहिती मिळत असल्याचा दावा करत त्यांनी तपासाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दमानिया यांनी या प्रकरणाला राजकीय संरक्षण मिळत असल्याचाही आरोप केला. रुपाली चाकणकर यांना वाचवण्यासाठी प्रयत्न सुरू असून त्यासाठी सुनील तटकरे सक्रिय असल्याचा गंभीर दावा त्यांनी केला. या आरोपांमुळे प्रकरणाला अधिक राजकीय रंग चढला आहे.

### पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्राचा दिलासा

# देशात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे जागतिक ऊर्जा बाजारात अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले असताना केंद्र सरकारने देशवासीयांना मोठा दिलासा दिला आहे. पेट्रोल, डिझेल, घरगुती एलपीजी, नैसर्गिक वायू आणि कच्च्या तेलाचा देशात पुरेसा साठा उपलब्ध असून कोणत्याही प्रकारच्या टंचाईची भीती नसल्याचे केंद्राने स्पष्ट केले आहे. सर्व तेल शुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यरत असून इंधन पुरवठा सुरळीत सुरू असल्याचेही सरकारने सांगितले.



पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी आंतर-मंत्रालयीन पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. एलपीजीचे उत्पादन सध्या विक्रमी पातळीवर असून दररोज सुमारे ९२ हजार मेट्रिक टन उत्पादन होत आहे. देशातील कोणत्याही एलपीजी वितरकाकडून साठा संपल्याची तक्रार प्राप्त झालेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

काही जिल्ह्यांमध्ये कृषी क्षेत्रातील वाढती मागणी आणि बाजारातील बदलत्या परिस्थितीमुळे पेट्रोल व डिझेलच्या विक्रीत असामान्य वाढ दिसून आली असली तरी पुरवठा व्यवस्थेवर त्याचा कोणताही परिणाम झालेला नाही, असेही शर्मा यांनी सांगितले. इंधनाची कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये यासाठी राज्य सरकारे, केंद्रशासित प्रदेश आणि उद्योग संघटनांना साठेबाजी व काळाबाजार रोखण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

ग्राहकांनी अफवांवर विश्वास न ठेवता इंधन आणि गॅस केवळ अधिकृत विक्रेत्यांकडूनच खरेदी करावा, असे आवाहनही केंद्र सरकारने केले आहे. इंधनाचा अतिरिक्त साठा करण्याची कोणतीही गरज नसल्याचे सरकारने पुन्हा एकदा स्पष्ट केले.

शर्मा यांनी सांगितले की, मार्चपासून आतापर्यंत ८.३ लाखांहून अधिक पीएनजी जोडण्या सुरू करण्यात आल्या आहेत, तर ८.५ लाख नवीन ग्राहकांची नोंदणी झाली आहे. गेल्या चार दिवसांत १.७८ कोटी एलपीजी रिफिल बुकिंग प्राप्त झाली असून जवळपास १.८ कोटी सिलिंडरचे वितरण करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, यापैकी ९६ टक्के वितरण डिजिटल पद्धतीने प्रमाणित करण्यात आले आहे. व्यावसायिक एलपीजीचा पुरवठा मजबूत असल्याचेही सरकारने स्पष्ट केले आहे.

औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांसाठी नैसर्गिक वायूचा पुरवठा ९९ टक्क्यांपर्यंत पूर्ववत करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

दरम्यान, बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयानेही कच्च्या तेलाच्या वाहतुकीबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. मंत्रालयाचे संचालक ओपेश कुमार शर्मा यांनी सांगितले की, 'निसोस केरोस' हे मालवाहू जहाज २५ ते २६ मे दरम्यान होर्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षितपणे मार्गक्रमण करून पुढे सरकले असून ते ३ जून रोजी विशाखापट्टणम येथे पोहोचणार आहे. या जहाजातून सुमारे २ लाख ७० हजार मेट्रिक टन कच्च्या तेलाची वाहतूक केली जात आहे.

### राहुल गांधींचे आरोप, धर्मेंद्र प्रधानांचा पलटवार

# सीबीएसई मूल्यमापनावरून वाद पेटला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावीच्या परीक्षा मूल्यमापन प्रक्रियेवरून देशातील राजकारण पुन्हा एकदा तापले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ केल्याचा गंभीर आरोप केला आहे, तर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी हे आरोप फेटाळून लावत काँग्रेसकडून शिक्षण व्यवस्थेचे राजकारण केले जात असल्याचा पलटवार केला आहे.

राहुल गांधी यांनी सीबीएसईच्या उत्तरपत्रिका मूल्यमापनासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कोएम्प्ट कंपनीच्या निवडीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ही कंपनी पूर्वी ग्लोबारेना या नावाने कार्यरत होती आणि तिच्याशी संबंधित काही वाद समोर आले होते, असा दावा त्यांनी केला. अशा पार्श्वभूमीच्या कंपनीला देशातील महत्त्वाच्या शैक्षणिक प्रक्रियेची जबाबदारी देण्यामागे नेमका कोणाचा निर्णय होता, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

सरकारवर टीका करताना राहुल गांधी म्हणाले की, कंपनीची पार्श्वभूमी तपासण्यात आली होती का, याचे उत्तर सरकारने द्यावे. जर तपासणी झाली असेल तर वादग्रस्त इतिहास असलेल्या संस्थेला काम का देण्यात आले आणि तपासणीच झाली नसेल तर ती अधिक गंभीर बाब असल्याचे त्यांनी म्हटले. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित विषयात सरकारने अधिक जबाबदारीने वागायला हवे होते, असेही त्यांनी नमूद केले.

या आरोपांना उत्तर देताना केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राहुल गांधींवरच निशाणा साधला. देशातील तांत्रिक आणि डिजिटल प्रगतीवर सातत्याने शंका उपस्थित करणे ही काँग्रेसची भूमिका राहिल्याचा आरोप त्यांनी केला. गैरप्रकार झाल्याचा दावा करण्यात येत असला तरी त्यासाठी कोणतेही ठोस पुरावे सादर करण्यात आलेले नाहीत, असे प्रधान म्हणाले.

प्रधान यांनी सांगितले की, यंदा सीबीएसईने प्रथमच मोठ्या प्रमाणावर ऑन-स्क्रीन मार्किंग प्रणालीचा वापर केला आहे. बारावीच्या परीक्षेला सुमारे १७ लाख विद्यार्थी बसले होते. त्यांच्या जवळपास ९८ लाख उत्तरपत्रिकांचे डिजिटायझेशन करण्यात आले. प्रत्येक उत्तरपत्रिकेत सरासरी ४० पाने असल्याने सुमारे ४० कोटी पानांचे स्कॅनिंग आणि डिजिटल मूल्यमापन करण्यात आले.

### साईबाबांना एक कोटींचा सुवर्ण मुकुट

**शिर्डी :** साईबाबा मंदिर येथे श्रद्धा, भक्ती आणि दानशूरतेचे आणखी एक अनोखे उदाहरण पाहायला मिळाले आहे. सोन्याच्या वाढत्या दरांनंतरही साईभक्तांची निष्ठा कमी झालेली नसल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून, लखनौ येथील साईभक्त गोविंद गोयल यांनी साईबाबांना तब्बल एक कोटी रुपयांहून अधिक किमतीचा सुवर्ण मुकुट अर्पण केला आहे. शुक्रवारी मध्यान्ह आरतीदरम्यान गोविंद गोयल आणि त्यांच्या परिवाराने साईबाबांच्या चरणी हा सुवर्ण मुकुट समर्पित केला. या मुकुटाचे वजन सुमारे ७८२ ग्रॅम असून, सध्याच्या बाजारभावानुसार त्याची किंमत अंदाजे १ कोटी १० लाख रुपये आहे.

# केरळ विधानसभेत 'वंदे मातरम्' वाद

### पिनराई विजयन यांचा भाजप-आरएसएसवर निशाणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तिरुवनंतपूरम :** केरळ विधानसभेत 'वंदे मातरम्' पूर्ण स्वरूपात सादर न केल्याच्या मुद्द्यावरून नव्या राजकीय वादाला तोंड फुटले आहे. या प्रकरणावर माजी मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते पिनराई विजयन यांनी भाजप आणि आरएसएसवर जोरदार टीका करत, "संपूर्ण 'वंदे मातरम्' गाणे गाण्याची कोणतीही गरज नाही. हा आरएसएसचा अजेंडा आहे," असे म्हटले आहे.

केरळ विधानसभेच्या अधिवेशनादरम्यान राज्यपालांच्या उपस्थितीत 'वंदे मातरम्'चे केवळ पहिले दोन कडवेच वाजवण्यात आले. यावर राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांनी नाराजी व्यक्त करत प्रोटोकॉलचे पालन झाले नसल्याचे म्हटले.

पिनराई विजयन यांनी स्पष्ट केले की, भारत सरकारने अधिकृतरीत्या 'वंदे मातरम्'ची केवळ पहिली दोन कडवी राष्ट्रीय गीत म्हणून मान्य केली आहेत. त्यामुळे पूर्ण गीत गाण्याचा आग्रह धरणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले. तसेच, या मुद्द्याचे राजकारण करून सांप्रदायिक ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. या वादानंतर भाजपने केरळ सरकारवर राष्ट्रगीत आणि राष्ट्रीय प्रतीकांचा अपमान केल्याचा आरोप केला आहे. भाजप नेते व्ही. मुरलीधरन यांनी विधानसभेतील निर्णयाला राज्यपालांचा अपमान असे संबोधले.

या पूर्वीही केरळमध्ये 'वंदे मातरम्'च्या पूर्ण आवृत्तीवरून वाद निर्माण झाला होता. काँग्रेस नेतृत्वाखालील सरकारच्या शपथविधी कार्यक्रमात पूर्ण गीत सादर करण्यात आल्यानंतर डाव्या पक्षांनी त्याला विरोध केला होता. सध्या या मुद्द्यावर केरळमध्ये सत्ताधारी काँग्रेस, डावे पक्ष आणि भाजप यांच्यात तीव्र राजकीय संघर्ष निर्माण झाला आहे.

### पाचव्यांदा डेडलाइन हुकणार, पुणेकरांमध्ये संताप

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोला पुन्हा विलंब

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणेकरांसाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पाला पुन्हा एकदा विलंब होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील लाखो कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन प्रवासाचा भार कमी करणारी ही मेट्रो सेवा जूनअखेर सुरू होण्याची अपेक्षा होती; मात्र आवश्यक सुरक्षा मंजुरी आणि सीएमआरएस चाचण्या अद्याप पूर्ण न झाल्याने उद्घाटन पुन्हा लांबणीवर पडण्याची चिन्हे आहेत. यामुळे सलग पाचव्यांदा या प्रकल्पाची डेडलाइन चुकणार असल्याने पुणेकरांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.




२३ किलोमीटर लांबीच्या या मेट्रो मार्गिकेचे काम गेल्या काही वर्षांपासून टप्प्याटप्प्याने सुरू आहे. सुरुवातीला २०२३ अखेर प्रकल्प पूर्ण होईल, असा दावा करण्यात आला होता. त्यानंतर २०२४, मग मार्च २०२६, त्यानंतर मे २०२६ आणि पुढे जूनअखेर अशी मुदत सतत पुढे ढकलण्यात आली. आता पहिल्या टप्प्यातील माण ते बालेवाडी दरम्यानच्या १२ स्थानकांचे उद्घाटन जुलैपर्यंत जाण्याची शक्यता अधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) अधिकाऱ्यांनी यापूर्वी प्रकल्पाचे ९५ टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झाल्याचा दावा केला होता. ट्रायल रन यशस्वी झाल्याचेही सांगण्यात आले होते; मात्र प्रत्यक्ष प्रवासी सेवा सुरू करण्यासाठी सीएमआरएसची अंतिम सुरक्षा मंजुरी अत्यावश्यक आहे. या मंजुरीशिवाय व्यावसायिक सेवा सुरू करता येत नसल्याने संपूर्ण प्रकल्प पुन्हा रखडला आहे.

हिंजवडी आयटी पार्क ते शिवाजीनगर या मार्गिकेला पुण्याच्या वाहतूक व्यवस्थेचा कणा मानले जाते. दररोज प्रचंड वाहतूक कोंडी, वाढते इंधनदर आणि तासन्तास प्रवास करणाऱ्या नागरिकांना या मेट्रोमुळे मोठा दिलासा मिळणार होता.

मात्र वारंवार बदलणाऱ्या मुदतींमुळे पुणेकरांमध्ये संताप वाढला असून सोशल मीडियावरही प्रशासनाची खिल्ली उडवली जात आहे. अनेक नागरिकांनी "मेट्रो सुरू होण्यापेक्षा तिच्या डेडलाइनच जास्त वेगाने धावत आहेत" अशा प्रतिक्रिया दिल्या आहेत.

या प्रकल्पाच्या विलंबामागे जमीन संपादनातील अडथळे, तांत्रिक बदल, काही ठिकाणचे रखडलेले बांधकाम आणि मंजुरी प्रक्रियेतील विलंब ही प्रमुख कारणे असल्याचे सांगितले जात आहे. विशेषतः बाणेर आणि शिवाजीनगर परिसरातील कामे अद्याप पूर्णपणे मार्गी लागलेली नाहीत.

दरम्यान, पहिल्या टप्प्यात हिंजवडीकडील १२ स्थानके सुरू करण्याचा प्रयत्न सुरू असून उर्वरित स्थानके ऑक्टोबरपर्यंत सुरू करण्याचे उद्दिष्ट असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. मात्र याआधीही अनेक वेळा मुदती बदलल्यामुळे नागरिक आता अधिकृत घोषणांवर विश्वास ठेवण्यास तयार नसल्याचे चित्र दिसत आहे.

# पुणे-नाशिक तसेच तळेगाव-चाकण मार्गावर वाहतूक कोंडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** शहरातील प्रमुख वाहतूक मार्ग असलेल्या पुणे-नाशिक महामार्ग आणि तळेगाव-चाकण रस्त्यावर शुक्रवारी भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाली. दोन्ही मार्गांवर सुमारे ६ ते ७ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या असून हजारो वाहनचालक आणि प्रवासी दोन तासांहून अधिक काळ कोंडीत अडकून पडले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आठवड्याच्या अखेरीस वाढलेली प्रवाशांची गर्दी आणि औद्योगिक क्षेत्रातील वाढती वाहतूक यामुळे या मार्गांवर अवजड वाहनांची संख्या अचानक वाढली. क्षमतेपेक्षा अधिक ट्रक आणि कंटेनर एकाच वेळी रस्त्यावर आल्याने वाहतुकीचा वेग मंदावला आणि दोन्ही दिशांनी कोंडी निर्माण झाली.

या वाहतूक कोंडीचा फटका नोकरदार, प्रवासी, मालवाहतूक करणारे चालक आणि स्थानिकांना बसला आहे. अनेक वाहने दीर्घकाळ एकाच ठिकाणी अडकून राहिल्याने प्रवाशांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले. वाहनचालकांना काही किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी तासन्तास प्रतीक्षा करावी लागली. वाहतूक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. कोंडी सोडवण्यासाठी पोलिसांकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू असून अवजड वाहनांना बाजूला करून लहान वाहनांसाठी मार्ग मोकळा करण्यात येत आहे. वाहतूक सुरळीत करण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळही तैनात करण्यात आले आहे. मात्र, रस्त्यांवरील वाहनांची संख्या मोठी असल्याने वाहतूक पूर्णपणे पूर्ववत होण्यासाठी वेळ लागला.

## संपादकीय

# काँग्रेसचे तेच तेच कथानक



**कर्नाटकमध्ये सिद्धरामय्या यांच्या राजीनाम्यानंतर डी. के. शिवकुमार यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाची धुरा सोपवण्याचा काँग्रेस हायकमांडचा निर्णय अनपेक्षित नसला, तरी या सत्तांतराच्या प्रक्रियेत पक्षाने पुन्हा एकदा आपले तेच जुने, थकलेले आणि अंतर्गत संघर्षाने भरलेले पारंपरिक राजकीय कथानक दाखवून दिले आहे.**

भारतीय राजकारणात सत्ताधारी पक्षातील नेतृत्वबदल ही एक सामान्य प्रक्रिया मानली जाते, परंतु काँग्रेस पक्षाच्या बाबतीत ही प्रक्रिया नेहमीच एका मोठ्या अंतर्गत नाटकात आणि संघर्षात रूपांतरित होते. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्यावरील भ्रष्टाचाराच्या आरोपांनंतर आणि न्यायालयीन प्रक्रियेच्या दबावामुळे त्यांना अखेर आपल्या पदाचा त्याग करावा लागला. या राजीनाम्यानंतर राज्याचे नवे मुख्यमंत्री म्हणून डी. के. शिवकुमार यांची निवड करण्यात आली. हा निर्णय वरवर पाहता अत्यंत सहज आणि एकमताने झाल्याचे भासविले जात असले, तरी त्यामागील अंतर्गत धुसफूस आणि सत्तासंघर्ष लपून राहिलेला नाही. काँग्रेस पक्षाने आपल्या या निर्णयाद्वारे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की, पक्षाकडे प्रादेशिक नेत्यांमधील अंतर्गत वाद मिटवण्यासाठी कोणत्याही प्रकारची नवीन किंवा ठोस व्यवस्था नाही. जेव्हा जेव्हा अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होते, तेव्हा पक्ष तात्पुरती मलमपट्टी करून संकट टाळण्याचा प्रयत्न करतो. सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार यांच्यातील राजकीय स्पर्धा ही २०२३ च्या विधानसभा निवडणुकीच्या विजयापासूनच सुरू झाली होती. त्यावेळीच मुख्यमंत्रिपदासाठी दोन्ही नेत्यांमध्ये तीव्र चुरस निर्माण झाली होती, परंतु हायकमांडने सिद्धरामय्या यांच्या अनुभवाला प्राधान्य दिले आणि शिवकुमार यांना उपमुख्यमंत्रिपदावर समाधान मानावे लागले. तेव्हापासूनच कर्नाटकातील सरकार अंतर्गत गटबाजीच्या छायेत काम करत होते. आता जेव्हा सिद्धरामय्या यांना मुदतपूर्व पायउतार व्हावे लागले, तेव्हा शिवकुमार यांनी आपल्या दाव्यावर ठाम राहून हे पद खेचून आणले. मात्र, हा नेतृत्वबदल होताना पक्षाला दिल्लीपासून ते बेंगळुरूपर्यंत ज्या प्रकारची कसरत करावी लागली, ती काँग्रेसच्या कमकुवत संघटनात्मक रचनेची साक्ष देते. एखाद्या राज्याचे नेतृत्व बदलताना होणारा हा प्रदीर्घ गोंधळ प्रशासनाला खिळवून ठेवतो आणि जनतेमध्ये चुकीचा संदेश पोहोचवतो. काँग्रेसचे हे कथानक नवीन नाही. राजस्थानमध्ये अशोक गेहलोत आणि सचिन पायलट यांच्यातील वाद असो, किंवा मध्य प्रदेशातील कमलनाथ आणि ज्योतिरादित्य शिंदे यांच्यातील संघर्ष असो, काँग्रेस हायकमांडने नेहमीच निर्णय घेण्यास कमालीचा विलंब लावला आहे. या विलंबाची किंमत बऱ्याचदा पक्षाला सत्ता गमावून मोजावी लागली आहे. कर्नाटकमध्ये सत्ता हातात असली, तरी अंतर्गत गटबाजी पूर्णपणे संपलेली नाही. सिद्धरामय्या यांचे समर्थक आमदार आणि शिवकुमार यांचे समर्थक यांच्यातील सुप्त संघर्ष आगामी काळात सरकारच्या स्थिरतेसमोर मोठे आव्हान उभे करू शकतो. मुख्यमंत्री बदलल्याने केवळ चेहऱ्यात बदल होतो, पण पक्षाची अंतर्गत कार्यपद्धती आणि धोरणात्मक त्रुटी तशाच राहतात, ही कटू वस्तुस्थिती आहे. शिवकुमार यांच्यासमोरील आव्हाने पक्षांतर्गत गटबाजीपुरती मर्यादित नसून, आर्थिक आणि प्रशासकीय आघाड्यांवरही आहेत. विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची आणि मोफत योजनांची पूर्तता करताना कर्नाटकच्या तिजोरीवर प्रचंड ताण पडला आहे. पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निधी कमी पडत असल्याच्या तक्रारी काँग्रेस आमदारांनीच केल्या आहेत. अशा परिस्थितीत, नव्या मुख्यमंत्र्यांना लोकप्रिय योजनांचा गाडा हाकतानाच राज्याचा आर्थिक ताळेबंद सांभाळावा लागणार आहे. विरोधी पक्षांकडून होणाऱ्या भ्रष्टाचाराच्या आरोपांचा सामना करणे आणि प्रशासनाला गती देणे हे देखील त्यांच्यासाठी सोपे असणार नाही. या सत्तांतराचा राष्ट्रीय राजकारणावर आणि विशेषतः आगामी निवडणुकांवर काय परिणाम होतो, यावरही सर्वांचे लक्ष असणार आहे. कर्नाटक हे दक्षिण भारतातील काँग्रेसचे सर्वांत मजबूत राज्य आहे. तिथल्या सरकारमधील अस्थिरता किंवा अंतर्गत वाद पक्षाच्या राष्ट्रीय प्रतिमेला धक्का पोहोचवणारे ठरतात. हायकमांडने या प्रकरणात हस्तक्षेप करून तात्पुरता तोडगा काढला असला, तरी प्रादेशिक नेत्यांचे महत्त्व आणि त्यांचा वाढता दबाव यांमुळे दिल्लीचे अधिकार काहीसे मर्यादित झाल्याचे दिसून येते. कर्नाटकातील हा नेतृत्वबदल म्हणजे काँग्रेससाठी एक मोठी राजकीय परीक्षा आहे. मुख्यमंत्र्यांचा चेहरा बदलून राज्यातील समस्या सुटणार नाहीत, तर त्यासाठी पक्षाला आपल्या पारंपरिक कार्यपद्धतीत आणि संघटनात्मक रचनेत मोठे बदल करावे लागतील. तरच कर्नाटकसारखे महत्त्वाचे राज्य काँग्रेस आपल्या ताब्यात ठेवू शकेल. तात्पुरत्या मलमपट्टीपेक्षा कायमस्वरूपी आणि शाश्वत तोडगे काढणे, हाच या राजकीय घडामोडींचा मुख्य धडा आहे.

# एल निनोचा फेरा आणि जागतिक हवामानाचा इशारा



**» जागतिक हवामान बदलाच्या तीव्र छायेत युरोपची उष्णतेची लाट आणि 'एल निनो'चा वाढता प्रभाव मानवी अस्तित्वासमोर मोठे संकट उभे करत आहे. निसर्गाचे हे बदलणारे रूप युरोपपुरते मर्यादित राहिलेले नाही.**

जागतिक पातळीवर हवामान बदलाचे परिणाम आता अधिक तीव्र आणि विनाशकारी होताना दिसत आहेत. २०२६ च्या उन्हाळ्यात युरोपने अनुभवलेली अभूतपूर्व उष्णतेची लाट आणि त्याला मिळालेली 'एल निनो' या हवामानशास्त्रीय घटकाची साथ, यामुळे जागतिक तापमानाचा पारा नव्या उच्चांकावर पोहोचला आहे. वैज्ञानिक विश्लेषणांनुसार, पॅसिफिक महासागरातील पाण्याच्या तापमानात होणारी वाढ म्हणजेच 'एल निनो'चा प्रभाव यंदा प्रचंड शक्तिशाली आहे. हा प्रभाव एका विशिष्ट प्रदेशापुरता मर्यादित न राहता, तो युरोपसारख्या थंड मानल्या जाणाऱ्या प्रदेशातही उष्णतेचा हाहाकार माजवण्यासाठी कारणीभूत ठरत आहे. जोपर्यंत जागतिक पातळीवर कार्बन उत्सर्जनाला आळा घालण्यासाठी ठोस पावले उचलली जात नाहीत, तोपर्यंत निसर्गाच्या या तीव्र कोपापासून मानवी वस्त्या सुरक्षित ठेवणे कठीण जाईल, ही कटू वस्तुस्थिती आहे.

या हवामान बदलांचा अभ्यास करताना 'एल निनो' आणि जागतिक तापमानवाढ म्हणजेच ग्लोबल वॉर्मिंग यांच्यातील घातक संबंध सर्वांत आधी समजून घ्यावा लागेल. एल निनोमुळे वातावरणात मोठ्या प्रमाणावर उष्णता उत्सर्जित होते, ज्यामुळे आधीच तापलेल्या पृथ्वीच्या तापमानात आणखी भर पडते. यंदा युरोपमधील अनेक देशांमध्ये तापमानाने चाळीस अंशांचा टप्पा ओलांडला असून, तिथली नद्यांची पातळी कमालीची खालावली आहे. उन्हाळ्याच्या या तीव्र चटक्यांमुळे जंगलांना आगी लागण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, तिथली जैवविविधता धोक्यात आली आहे. युरोपमधील ही परिस्थिती आशिया आणि आफ्रिकेसारख्या विकसनशील देशांसाठी अधिक चिंताजनक आहे, कारण या देशांकडे अशा हवामान संकटांचा सामना करण्यासाठी पुरेशी आर्थिक आणि तांत्रिक संसाधने उपलब्ध नाहीत.

अतिउष्णतेमुळे उष्माघाताचे रुग्ण वाढत असून, शेती उत्पादनावर याचा मोठा फटका बसत आहे. युरोपमधील गहू आणि इतर पिकांचे उत्पादन घटण्याची भीती निर्माण झाली असून, यामुळे जागतिक अन्न पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. जेव्हा अन्नधान्याचे उत्पादन घटते, तेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात महागाई भडकते, ज्याचा थेट त्रास गरीब देशांना सहन करावा लागतो. याशिवाय, वीज आणि ऊर्जेची मागणी प्रचंड वाढल्यामुळे ऊर्जा क्षेत्रावर मोठा ताण पडत आहे. अशा परिस्थितीत, पारंपरिक इंधनाचा वापर वाढल्यास कार्बन उत्सर्जनात आणखी भर पडते, ज्यामुळे हे दुष्टचक्र अविरत सुरू राहते.

या समस्येवर मात करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाने आता चर्चासत्रांपलीकडे जाऊन 'हवामान कृती योजना' अधिक आक्रमकपणे राबवणे गरजेचे आहे. पॅरिस हवामान करारातील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सर्वच देशांनी अक्षय ऊर्जेचा वापर वाढवला पाहिजे. हरित तंत्रज्ञानाचा विकास करून ते गरीब देशांपर्यंत पोहोचवणे, हे विकसित देशांचे कर्तव्य असायला हवे. परंतु, आंतरराष्ट्रीय राजकारणातील भू-राजकीय तणाव आणि आर्थिक नफा-तोटा केंद्रित धोरणांविषयीच्या वादामुळे हवामान बदलाच्या लढ्याला अपेक्षित गती मिळत नाही, हे दुर्दैव आहे. चीन आणि अमेरिकेसारख्या मोठ्या उत्सर्जक देशांनी या संकटाचे गांभीर्य ओळखून एकत्र येणे, हे जागतिक स्थिरतेसाठी सर्वांत मोठे आव्हान आहे.

निसर्गाचे हे बदलते स्वरूप हा मानवाने निसर्गावर केलेल्या अत्याचाराचा थेट परिणाम आहे. शाश्वत विकासाची संकल्पना जोपर्यंत आपण आपल्या जीवनशैलीत आणत नाही, तोपर्यंत अशा संकटांची वारंवारता आणि तीव्रता वाढतच राहील. निसर्गाशी समतोल सांधूनच मानवाचा विकास घडू शकतो, हाच या उष्णतेच्या लाटेने दिलेला अंतिम धडा आहे.

२०२६ मधील 'एल निनो'चा हा तीव्र फेरा जागतिक हवामान व्यवस्थेचे संतुलन बिघडवणारा ठरत आहे. यातून बाहेर पडण्यासाठी तात्कालिक उपायांपेक्षा दीर्घकालीन आणि सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. पृथ्वीचे तापमान दीड अंशाच्या मर्यादेत ठेवण्यासाठी आता प्रत्येक देशाला आपल्या आर्थिक धोरणांमध्ये पर्यावरणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल.

उद्योगजगताला आणि धोरणकर्त्यांना नफ्यासोबतच पर्यावरणाच्या रक्षणाची निश्चितता वाटेल, असे वातावरण निर्माण करणे हाच या जागतिक संकटातून मानवी संस्कृतीला वाचवण्याचा खरा मार्ग आहे.

# स्मार्ट सिटी कंपनी बंद करण्याचा निर्णय पुन्हा लांबणीवर

## अंतिम निर्णय महापालिका आयुक्तांच्या कोर्टात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** वादग्रस्त ठरलेल्या पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी कंपनीला तात्काळ गुंडाळण्याचे आदेश राज्य शासनाने दिले होते. मात्र, स्मार्ट सिटी कंपनी बंद करण्याचा अधिकार राज्य शासनाला नसून तो केंद्र सरकारच्या अखत्यारित येतो, असा मुद्दा काही महापालिकांनी उपस्थित केल्यानंतर शासनाने आपला निर्णय मागे घेतला आहे. त्यामुळे स्मार्ट सिटी कंपनीचे कामकाज अद्याप सुरू असून, कंपनी सुरू ठेवायची की बंद करायची याचा अंतिम निर्णय आता महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या कोर्टात गेला आहे.

केंद्र सरकारच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाने २५ जून २०१५ रोजी देशातील १०० शहरे स्मार्ट बनविण्याच्या उद्देशाने स्मार्ट सिटी अभियान सुरू केले होते. त्यानुसार १३ जुलै २०१७ रोजी पिंपरी-चिंचवड शहराचा तिसऱ्या टप्प्यात समावेश करण्यात आला. त्यासाठी महापालिकेने ‘पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड’ या स्वतंत्र कंपनीची स्थापना केली होती. केंद्र शासनाने २७ मार्च २०२५ रोजी स्मार्ट सिटी अभियान गुंडाळण्याचा निर्णय घेतला आणि त्यानंतर निधी वितरण थांबविण्यात आले. त्यामुळे प्रकल्पांचा संपूर्ण आर्थिक भार महापालिकेवर पडला आहे. आतापर्यंत तब्बल १ हजार ३७८ कोटी ५६ लाख रुपये खर्च करूनही अनेक प्रकल्प अपूर्ण अवस्थेत आहेत. काही प्रकल्प कालबाह्य झाले असून महापालिकेवर आर्थिक ताण वाढला आहे.

स्मार्ट सिटी कंपनीला जुलै २०२५ मध्ये आठ वर्षे पूर्ण झाली. त्यानंतर विकसित प्रकल्प महापालिकेकडे हस्तांतरित करून कंपनी बरखास्त होणे अपेक्षित होते. मात्र, काही अधिकारी आणि सल्लागार संस्थांनी त्यास विरोध दर्शविला. सध्या चिंचवड येथील ऑटो क्लस्टरमधून स्मार्ट सिटीचे कामकाज सुरू असून, कंत्राटी अधिकाऱ्यांना दरमहा दीड ते दोन लाख रुपये वेतन दिले जात आहे. कार्यालयीन खर्च, प्रकल्पांची देखभाल, वीजबिल आणि कर्मचारी वेतन यासाठी महापालिकेला दरवर्षी सुमारे ५० कोटी रुपयांचा खर्च करावा लागत आहे.

तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी ३१ मार्च पर्यंत स्मार्ट सिटी कंपनी बरखास्त करून सर्व प्रकल्प संबंधित विभागांकडे हस्तांतरित करण्याचे आदेश दिले होते. त्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करून प्रकल्पांचा अहवालही तयार करण्यात आला. मात्र, निर्धारित मुदतीत कंपनी बंद करण्यात आली नाही. राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने २१ एप्रिल रोजी सर्व महापालिकांना स्मार्ट सिटी कंपन्या बंद करण्याचे आदेश दिले. संचालक मंडळ बरखास्त करून सर्व अधिकार आयुक्तांकडे देण्याचे तसेच कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, या निर्णयाविरोधात एका महापालिकेने उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने स्मार्ट सिटी कंपनी बंद करण्याचा अधिकार राज्य शासनाला नसल्याचे स्पष्ट करत कंपनी कायद्यानुसार ती सुरू ठेवता येऊ शकते, असे नमूद केले. त्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांनी राज्य शासनाकडे मार्गदर्शन मागितले होते. राज्य शासनाने १९ मे रोजी शुद्धीपत्रक जारी करून स्मार्ट सिटीचे संचालक मंडळ कायम ठेवण्याचा निर्णय संबंधित महापालिका आयुक्त घेतील, असे स्पष्ट केले. त्यामुळे स्मार्ट सिटी कंपनीचे कामकाज अद्याप सुरू असून पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

कोट्यवधी रुपये खर्च करूनही अनेक कामे दर्जाहीन झाल्याची टीका होत आहे. काही प्रकल्प अर्धवट अवस्थेत असून, त्यांची देखभाल व पूर्णत्वासाठी अतिरिक्त निधी खर्च करावा लागणार आहे. स्मार्ट सिटी प्रकल्पांचा बोजा भविष्यातही महापालिकेवर कायम राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त अभिवादन



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत आयोजित कार्यक्रमात उपमहापौर शर्मिला बाबर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपआयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते यशवंत कण्हेरे, विविध विभागांतील कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते.

# पिंपरी-चिंचवडसह राज्यात सीएनजी तुटवडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** राज्यभरात इंधन तुटवड्याच्या चर्चांनी जोर धरला असताना पिंपरी-चिंचवड शहरासह विविध भागांत सीएनजीचा मोठा तुटवडा जाणवत आहे. पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढलेले असतानाच वेळेवर इंधन उपलब्ध होत नसल्याने वाहनचालक त्रस्त झाले आहेत. तांत्रिक बिघाड, पुरवठ्यातील अडथळे आणि काही सीएनजी केंद्रांवरील दुरुस्तीची कामे यामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली असून, वाहनचालकांना सीएनजी भरण्यासाठी तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे.



पिंपरी-चिंचवड शहरासाठी महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडकडून (एमएनजीएल) दिवसाला दोन लाख किलो गॅस पुरवठ्याची मर्यादा पुढील दहा वर्षांसाठी निश्चित करण्यात आली होती. मात्र, वाढत्या वाहनसंख्येमुळे ही मर्यादा अवघ्या तीन वर्षांतच पूर्ण झाली आहे. शहरात सीएनजी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून घरगुती गॅस जोडण्यांचाही विस्तार झपाट्याने झाल्याने पुरवठ्यावर ताण निर्माण झाला आहे. सीएनजी पंपांवर “गॅसची गाडी आलेली नाही”, “वीजपुरवठा खंडित झाला आहे” किंवा “गॅस संपला आहे” अशी कारणे सांगितली जात असल्याने वाहनधारकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः रिक्षाचालक आणि कॅबचालकांना मोठा आर्थिक फटका बसत असून त्यांच्या दैनंदिन उत्पन्नावर परिणाम होत आहे. आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर शहरात सीएनजीचा मोठा तुटवडा निर्माण झाल्याच्या अफवा सोशल मीडियावर वेगाने पसरत आहेत. मात्र, पंपचालकांनी या अफवा फेटाळून लावत पुरवठा पूर्णपणे बंद झालेला नसल्याचे स्पष्ट केले आहे. शहरात सध्या ७० ते ७५ सीएनजी पंप कार्यरत असून वाहनचालकांनी घाबरून अनावश्यक गर्दी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

अफवांमुळे अनेक वाहनधारक टाक्या पूर्ण भरून घेत असल्याने काही पंपांवर मोठी गर्दी होत आहे. काही भागांमध्ये मर्यादित पुरवठ्यामुळे सीएनजी पंप दिवसातील काही तास बंद ठेवण्याची वेळ आली आहे. परिणामी पहाटेपासूनच वाहनांच्या रांगा लागत असून शहरातील वाहतुकीवरही त्याचा परिणाम होत आहे.

# येरवडा कारागृहात तंबाखूवरून कैद्यांमध्ये हाणामारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** येरवडा मध्यवर्ती कारागृहात तंबाखू मागण्याच्या कारणावरून कैद्यांमध्ये जोरदार हाणामारी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. दोन कैद्यांनी एका कैद्याला बेदम मारहाण करत त्याच्या डोक्यात जेवण वाढण्यासाठी वापरले जाणारे छोटे माप आणि प्लास्टिकची बादली मारल्याने कारागृहात खळबळ उडाली आहे.

याप्रकरणी वरिष्ठ कारागृह अधिकारी रेवणनाथ कानडे यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून संबंधित दोन्ही कैद्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी साडेसातच्या सुमारास सर्कल क्रमांक दोनमधील बराकीजवळील स्वच्छतागृह परिसरात ही घटना घडली. संबंधित कैदी प्रसाधनगृहात जात असताना दोघांनी त्याला अडवून तंबाखूची मागणी केली. त्यानंतर झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. संतापलेल्या दोन्ही कैद्यांनी संबंधितावर हल्ला करत त्याला मारहाण केली. या घटनेची माहिती मिळताच कारागृह रक्षकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली आणि दोन्ही आरोपी कैद्यांना ताब्यात घेतले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कुंदन सत्रे करत आहेत.

दरम्यान, येरवडा कारागृहात कैद्यांमधील हाणामारी आणि गैरप्रकारांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने कारागृह सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. कारागृह परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असले तरी वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे प्रशासनाच्या सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

### १२ लाखांचा गांजा जप्त

**पिंपरी :** अंमली पदार्थविरोधी पथकाने मोठी कारवाई करत शिक्रापूर-चाकण महामार्गावरील मोहितेवाडी परिसरातून तब्बल १२ लाख १० हजार ५०० रुपयांचा गांजा जप्त केला आहे. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरोधात चाकण दक्षिण पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई २७ मे रोजी दुपारी शेलपिंपळगाव येथील शिक्रापूर-चाकण हायवे रोडलगत असलेल्या हॉटेल वैष्णवीसमोर करण्यात आली. याप्रकरणी अंमली पदार्थविरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी-चिंचवड येथील पोलीस शिपाई निखिल बाळासाहेब वर्षे यांनी फिर्याद दिली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये संदीप भगवान हांडे (वय २८, रा. खराबवाडी, ता. खेड), गणेश सुरेश तारु (वय ३०, रा. खराबवाडी, ता. खेड) आणि रिहान वसिम शेख (वय १९, रा. खंडोबामाळ, चाकण) यांचा समावेश आहे.

पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून २३ किलो ५३८ ग्रॅम गांजा, तीन मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा एकूण १२ लाख १० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी चाकण दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मोते करत आहेत.

### महिलेकडून वेश्याव्यवसाय

**पिंपरी :**

देहूरोड पोलिस ठाण्यात आर्थिक फायद्यासाठी महिलेला वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडल्याप्रकरणी एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २७ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ८.५५ वाजण्याच्या सुमारास हॉटेल स्काय इन लॉज येथे ही कारवाई करण्यात आली. हे हॉटेल सिटी वन स्क्वेअर, कस्तुरी कॉर्नर, साई पार्क टाउन, किवळे येथे आहे. या प्रकरणी सुनिल जगन्नाथ शिरसाट यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी प्रेम विश्राम जैसवाल (वय ५०) याला अटक केली आहे. आरोपी सध्या मुकाई चौक, किवळे येथील वेदांत पार्क येथे राहत असून तो मूळचा मध्य प्रदेशातील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपीने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी पीडित महिलेला पैशांचे आमिष दाखवून तिच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

# पत्नीच्या खोट्या सह्या करून मॉर्गेज लोन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पत्नीच्या नकळत तिच्या नावाचा व कागदपत्रांचा वापर करून मॉर्गेज लोन घेतल्याप्रकरणी पतीविरुद्ध हिंजवडी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सप्टेंबर २०२१ ते डिसेंबर २०२१ या कालावधीत ॲक्सिस बँक, हिंजवडी येथे घडली.

याप्रकरणी एका महिलेने २८ मे २०२६ रोजी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार संदेश शशीकांत आंब्रो (रा. आंब्रो रेसिडन्सी, तापकीर मळा चौक, राजवाडे नगर, काळेवाडी, पुणे) याच्याविरुद्ध भारतीय दंड विधान संहितेच्या कलम ४६५, ४६८, ४७१, ४२० आणि ५०४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादीचा लग्नापूर्वीच्या ‘अस्मिता प्रकाश घाग’ या नावाचा वापर केला. तसेच तिच्या वैयक्तिक कागदपत्रांचा गैरवापर करून तिला कोणतीही पूर्वकल्पना न देता मॉर्गेज लोनमध्ये सह-भागीदार दाखवले. आरोपीने मॉर्गेज लोनच्या कागदपत्रांवर फिर्यादीच्या खोट्या सह्या करून ॲक्सिस बँकेकडून कृष्णा रेसिडन्सी, काळेवाडी येथील फ्लॅटवर ४१ लाख २५ हजार ७८८ रुपयांचे कर्ज घेतल्याचा आरोप आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### जनगणनेत अडथळा; शिक्षकांविरोधात गुन्हा

**लोणी काळभोर :** केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी जनगणना २०२७ मोहिमेच्या कामकाजात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी लोणी काळभोर परिसरातील पाच शिक्षकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याने शैक्षणिक व प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. तहसील प्रशासनाने आदेश देऊनही संबंधित शिक्षक जनगणना कामासाठी हजर न राहिल्याने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. शिल्पा राजाभाऊ येरमाळकर, सुनिल दिलीप शेळके, शिवाजी संभाजी गायकवाड, प्रदीप बबन पारधी आणि शन्नो जॉक्सन गगादे अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या शिक्षकांची नावे आहेत. याप्रकरणी अमोल नवनाथ गव्हाणे (वय ४१, रा. रायकर मळा, धायरी, ता. हवेली) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणी काळभोर तहसील हद्दीत जनगणना २०२७ चा कार्यक्रम राबविण्यात येत असून, या कामासाठी संबंधित शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. चार्ज ऑफिसर तथा तहसीलदार तृप्ती कोलते-पाटील यांनी शासनाच्या पोर्टलद्वारे तसेच पर्यवेक्षक अधिकाऱ्यांमार्फत संबंधितांना आदेश कळवले होते. मात्र, आदेश मिळूनही संबंधित शिक्षकांनी कामकाजासाठी हजर राहण्यास टाळाटाळ केली आणि काम करण्यास नकार दिल्याचे समोर आले. जनगणना प्रक्रियेत अडथळा निर्माण करण्याच्या उद्देशानेच संबंधित शिक्षकांनी आदेशांचे पालन केले नाही. त्यामुळे ग्राम महसूल अधिकारी अमोल गव्हाणे यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पाचही शिक्षकांविरोधात जनगणना अधिनियम १९४८ च्या कलम ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास लोणी काळभोर पोलीसचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पूजा माळी करत आहेत.

---

### अमित शाह यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केंद्र सरकार सकारात्मक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** महाराष्ट्रातील कांदा उत्पादक आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत नवी दिल्लीत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने या बैठकीत सहभाग घेतला. केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान आणि केंद्रीय सार्वजनिक वितरणमंत्री प्रल्हाद जोशी हे देखील बैठकीस उपस्थित होते.

बैठकीत कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. नाफेड आणि एनसीसीएफमार्फत थेट व्यापाऱ्यांकडून नव्हे, तर शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करण्याची मागणी केंद्र सरकारने मान्य केली असल्याची माहिती देण्यात आली. सध्या सुरू असलेली दोन लाख टन कांदा खरेदी वाढवून ती दहा लाख टनांपर्यंत नेण्याबाबतही केंद्र सरकारने सकारात्मक भूमिका घेतल्याचे सांगण्यात आले.

देशांतर्गत बाजारपेठेवर परिणाम होऊ नये यासाठी कांदा बियाण्यांच्या निर्यातीवर 'एक्सपोर्ट सरचार्ज' लागू करण्याची मागणीही बैठकीत मांडण्यात आली. तसेच कांद्याच्या ग्रेडिंग प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आधुनिक यंत्रसामुग्रीचा वापर करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. यामुळे शेतकऱ्यांना योग्य दर मिळण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. कांद्याच्या खरेदी दरात नुकतीच वाढ करण्यात आली असून, तो आणखी वाढवण्याबाबतही केंद्र सरकारकडून सकारात्मक संकेत मिळाल्याचे बैठकीनंतर सांगण्यात आले. तसेच कांदा निर्यातीवर कोणतीही बंदी नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, साखर उद्योग आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही बैठकीत महत्त्वपूर्ण चर्चा झाली. साखरेच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करणे, इथेनॉल उत्पादनाचा कोटा वाढवणे, साखर कारखान्यांचे कर्ज पुनर्गठन तसेच व्याज सवलतीची रक्कम तातडीने वितरित करणे या मागण्यांवर केंद्र सरकारने सकारात्मक भूमिका घेतल्याचे सांगण्यात आले.

यंदाच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे साखर उद्योगासमोर निर्माण झालेल्या अडचणी लक्षात घेता इथेनॉल कोट्याबाबत पुढील दोन महिन्यांत निर्णय घेण्यास सहमती दर्शविण्यात आल्याची माहिती देण्यात आली. तसेच 'क्वेल प्रायसिंग' संदर्भातील प्रस्ताव राज्य सरकारकडून केंद्राकडे सादर करण्यात येणार असून, त्याद्वारे साखर उद्योगातील अनेक प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या बैठकीस जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, पणनमंत्री जयकुमार रावल, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्यासह अनेक खासदार, आमदार, सहकार क्षेत्रातील पदाधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने मांडलेल्या मागण्यांबाबत केंद्र सरकारने सकारात्मक भूमिका घेतल्याने महाराष्ट्रातील कांदा आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

## डिंभे उजव्या कालव्यातून पाणी सोडल्याने शेतीला दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** डिंभे धरण (हुतात्मा बाबु गेणु जलाशय) येथून उजव्या कालव्यात पाणी सोडण्यात आल्याने आंबेगाव आणि शिरूर तालुक्यातील सुमारे ६० गावांतील शेतीपिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. ऐन उन्हाळ्यात निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय झाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

आंबेगाव आणि शिरूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. उजव्या कालव्यालगत असलेल्या गावांतील शेतकऱ्यांकडून कालव्यात तातडीने पाणी सोडण्याची मागणी सातत्याने करण्यात येत होती. विविध गावांतील शेतकऱ्यांनी राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांना यासंदर्भात निवेदनही दिले होते. या मागणीची दखल घेत दिलीप वळसे पाटील यांनी मंत्रालयात संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. त्यावेळी डिंभे धरणाच्या उजव्या कालव्यातून उन्हाळी हंगामातील शेतीपिकांच्या सिंचनासाठी पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार आता कालव्यात पाणी सोडण्यात आले आहे. या पाण्याचा लाभ नारोडी, लांडेवाडी, मंचर, अवसरी खुर्द, गावडेवाडी, अवसरी बुद्रुक, मेंगडेवाडी, जारकरवाडी, पोंदेवाडी, खडकवाडी, सविंदणे, कवठे, मलठण, सोनसांगवी आदी गावांसह सुमारे ६० गावांना होणार आहे. तीव्र उन्हामुळे परिसरातील विहिरी आणि पाझर तलावातील पाणी झपाट्याने कमी होत होते. परिणामी अनेक ठिकाणी शेतीपिके करपण्याच्या स्थितीत आली होती. कालव्यात पाणी नसल्याने शेतकरी चिंतेत होते. मात्र आता पाणी उपलब्ध झाल्याने पिकांना जीवदान मिळणार असून, शेती वाचण्याची आशा निर्माण झाली आहे.


या निर्णयामुळे शेतीपिकांना मोठा आधार मिळणार असून, शेतकऱ्यांनी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचे आभार व्यक्त केले आहेत.

---

## श्री क्षेत्र भीमाशंकर येथे दर्शन सुविधा हवी

### दिलीप वळसे पाटील यांच्या देवस्थानला सूचना

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** बारा ज्योतिर्लिंगांपैकी सहावे ज्योतिर्लिंग असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात न जाता बाहेरून कायमस्वरूपी दर्शनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी सक्त सूचना माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी भीमाशंकर देवस्थान समितीला केली आहे. मंदिर दर्शनासाठी लवकरच पूर्णपणे खुले होणार असल्याने भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता असून, गर्दीचे योग्य नियोजन आणि सर्वांना सुलभ दर्शन मिळावे यासाठी ही मागणी ग्रामस्थ आणि भाविकांकडून सातत्याने होत होती.

श्री क्षेत्र भीमाशंकर परिसर विकास आराखड्याअंतर्गत सुरू असलेल्या विविध कामांची पाहणी करण्यासाठी वळसे पाटील यांनी भेट दिली. यावेळी देवस्थान समितीचे अध्यक्ष अ‍ॅड. सुरेश कौदरे, विश्वस्त मधुकर गवांदे, दत्तात्रय कौदरे, उदय गवांदे, गोरक्ष कौदरे, भीमाशंकरचे सरपंच दत्तात्रय कौदरे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच पुणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, पंचायत समिती सभापती कैलासबुवा काळे, मारुती लोहकरे, कोढवळ निगडाळे ग्रामपंचायतीच्या सरपंच सविता कोकाटे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या कार्यकाळात मंजूर करण्यात आलेल्या १४८ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याच्या कामांचा आढावा घेण्यात आला. प्रत्येक कामासाठी मंजूर निधी आणि प्रत्यक्षात झालेली कामे याबाबत माहिती घेण्यात आली. तसेच नव्याने सुरू करण्यात आलेल्या २८८ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याची माहिती घेत, ही सर्व कामे दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने करण्याच्या सूचना वळसे पाटील यांनी सवाणी हेरिटेजच्या प्रतिनिधींना दिल्या. यानंतर त्यांनी पायरी मार्ग, भीमाशंकरवाडी गावठाण, भीमा नदी उगमस्थळ, पर्यायी मार्ग, कळमजाई मंदिर, हनुमान तळे परिसर, महादेव गार्डन आणि बसस्थानक परिसराची पाहणी केली.

दरम्यान, मंदिरासमोर सुरू असलेल्या सभामंडपाच्या कामाबाबतही ग्रामस्थांनी महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. सभामंडप पूर्णपणे बंदिस्त न करता तिन्ही बाजूंनी खुला ठेवावा, जेणेकरून भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडल्यास भाविकांना सुरक्षितपणे आणि सुलभतेने बाहेर पडता येईल, अशी मागणी भाविक राजेंद्र यादव आणि प्रल्हाद हिंगे यांनी केली आहे.

---

## शिरुर बाजार समितीची निवडणूक जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**रांजणगाव गणपती :** पुणे जिल्ह्यातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या शिरुर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीचे बिगुल अखेर साडेतीन वर्षांनंतर वाजले असून, बाजार समितीच्या १८ जागांसाठी येत्या ५ जुलै रोजी मतदान होणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक हरिश्चंद्र कांबळे यांनी ही माहिती दिली.

शिरुर बाजार समितीच्या तत्कालीन संचालक मंडळाचा कार्यकाल डिसेंबर २०२२ मध्ये संपल्यानंतर समितीवर प्रशासकीय कारभार सुरू होता. अखेर बुधवारी (दि. २७) राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाकडून पंचवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला. निवडणूक कार्यक्रमानुसार शुक्रवार (दि. २९) पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ४ जून आहे. ५ जून रोजी अर्जांची छाननी होणार असून, २२ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. २३ जून रोजी उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप केले जाणार आहे. त्यानंतर ५ जुलै रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार असून, मतदानानंतर लगेचच मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाणार असल्याचे कांबळे यांनी सांगितले. बाजार समितीतील सेवा सहकारी मतदारसंघाच्या ११ जागांपैकी सात जागा खुल्या प्रवर्गासाठी राखीव आहेत. तसेच दोन जागा महिला प्रतिनिधींसाठी, तर इतर मागास प्रवर्ग आणि भटक्या जाती-विमुक्त जमातींसाठी प्रत्येकी एक जागा राखीव ठेवण्यात आली आहे. ग्रामपंचायत मतदारसंघातील चार जागांपैकी दोन जागा खुल्या असून, अनुसूचित जाती-जमाती आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी प्रत्येकी एक जागा राखीव आहे. व्यापारी-आडते मतदारसंघातून दोन, तर हमाल-मापाडी मतदारसंघातून एक प्रतिनिधी निवडला जाणार आहे.

दरम्यान, नवीन सहकार नियमानुसार दहा गुंठ्यांपेक्षा अधिक शेती असलेल्या कोणत्याही गावातील शेतकऱ्याला ही निवडणूक लढवता येणार असल्याने यंदा उमेदवारांची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून या बाजार समितीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व राहिले आहे. मात्र, यंदाच्या निवडणुकीत राज्यातील सत्तेत महायुतीत एकत्र असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप यांच्यात थेट राजकीय संघर्ष होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

---

## आंबेगावात जनगणनेला सुरुवात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** आंबेगाव तालुक्यात राष्ट्रीय जनगणनेच्या पहिल्या टप्प्याला सुरुवात झाली असून, नियुक्त प्रगणक आणि पर्यवेक्षक घरोघरी जाऊन माहिती संकलन करत आहेत. नागरिकांनी कोणतीही भीती किंवा गैरसमज न बाळगता अचूक आणि खरी माहिती द्यावी, तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रभारी तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांनी केले आहे.

जनगणना २०२७ अंतर्गत १५ मे ते १५ जून या कालावधीत घरांची यादी आणि गृहनिर्माण गणना करण्यात येत आहे. या पहिल्या टप्प्यात नियुक्त प्रगणक आणि पर्यवेक्षक घरोघरी भेट देऊन आवश्यक माहिती संकलित करत आहेत. महाराष्ट्र राज्य जनगणना संचालनालयाच्या निर्देशानुसार हा कार्यक्रम राबविण्यात येत असून, १ मे ते १५ मे या कालावधीत स्वयं-गणना, तर १६ मे ते १४ जून दरम्यान घर यादी आणि घरगणना प्रक्रिया सुरू आहे. आंबेगाव तालुक्यात या कामासाठी १ चार्ज ऑफिसर, ४ चार्ज युजर, ८ फील्ड ट्रेनर, ६६ पर्यवेक्षक, ७ राखीव पर्यवेक्षक, ३९४ प्रगणक आणि ४० राखीव प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे. स्वतंत्र भारताची आठवी जनगणना कोरोनामुळे विलंबाने सुरू झाली असून, शासकीय कर्मचारी आणि शिक्षक प्रखर उन्हात घरोघरी जाऊन माहिती गोळा करत आहेत.

मोबाइल अ‍ॅपच्या माध्यमातून सुमारे ३४ प्रश्नांची माहिती संकलित केली जात असून, घरगणना आणि गृहनिर्माणविषयक आकडेवारी तयार केली जात आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे प्रगणकांची दमछाक होत असली तरी जनगणनेचे काम नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.

---

## शिक्षिकेचा भीषण अपघातात मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** शासकीय जनगणना कामासाठी जात असलेल्या एका शिक्षिकेचा भरधाव कंटेनरच्या धडकेत जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना बुधवारी (दि. २७) कान्हे फाटा, ता. मावळ येथे घडली. या अपघातात दीपाली सुजित तांबे (वय ५१, रा. मंचर) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, मंचरसह मावळ तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दीपाली तांबे या अहिरेवाडी (ता. मावळ) येथे शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. शासनाच्या जनगणना संदर्भातील कामासाठी त्या बुधवारी सकाळी दुचाकीवरून निघाल्या होत्या. दरम्यान, पुणे-मुंबई महामार्गालगत कान्हे फाटा परिसरात त्यांच्या दुचाकीला भरधाव वेगाने येणाऱ्या कंटेनरने जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की, दुचाकीचा मोठ्या प्रमाणात चुराडा झाला आणि दीपाली तांबे यांचा जागीच मृत्यू झाला.

दीपाली तांबे या कर्तव्यदक्ष आणि विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय शिक्षिका म्हणून ओळखल्या जात होत्या. शासकीय जबाबदारी पार पाडण्यासाठी जात असतानाच त्यांचा दुर्दैवी अंत झाल्याने शिक्षक वर्गातून तीव्र शोक व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेनंतर मंचर परिसरात शोककळा पसरली असून, अनेकांनी सोशल मीडियावर श्रद्धांजली अर्पण केली आहे. या अपघातामुळे महामार्गावरील भरधाव अवजड वाहनांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, कठोर वाहतूक नियंत्रण आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांची मागणी होत आहे.

मंचरची लेक असलेल्या दीपाली तांबे यांच्या निधनाची बातमी समजताच लोंढे आणि बाणखेले कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यांचे वडील रामदास गंगाराम लोंढे हे मूळचे मंचर येथील असून, शिक्षण क्षेत्रात कार्यरत होते. आई-वडील दोघेही मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यानंतर कुटुंब पुण्यात स्थायिक झाले होते. दीपाली यांचे मामा विलास बाणखेले आणि अजित बाणखेले यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. विवाहानंतर आणि नोकरीनिमित्त त्या पुण्यात राहत असल्या तरी मंचर गावाशी त्यांची नाळ कायम जोडलेली होती. वडिलांच्या मंचर आणि थोरांदळे येथील शेतीकडे त्या नियमित येत असत. यात्रा-उत्सव तसेच कार्यक्रमांमध्ये त्या कुटुंबासह आवर्जून सहभागी होत असत, अशी माहिती त्यांचे चुलत बंधू प्रवीण लोंढे यांनी दिली. दीपाली यांना एक मुलगा आहे.

---

### शेतकऱ्यांचा संताप, राजकीय नेत्यांवर निशाणा

# ऐन उन्हाळ्यात इंदापूर तालुक्यात पाणीप्रश्न गंभीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी देवकर :** इंदापूर तालुक्यातील पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असून, शेतकऱ्यांची सहनशीलता आता संपत चालली आहे. उन्हाळ्यात उजनी आणि खडकवासला कालव्याचे हक्काचे पाणी मिळत नसल्याने संतप्त शेतकरी "हे पाणी नेमके मुरतेय कुठे?" असा सवाल उपस्थित करत आहेत. एकेकाळी पाण्याने समृद्ध असलेला इंदापूर तालुका आता हळूहळू वाळवंटी भागात परिवर्तित होत असल्याची भावना शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

पूर्वी नगदी पिके आणि भाजीपाला उत्पादनासाठी ओळखला जाणारा इंदापूर तालुका खडकवासला आणि उजनी धरणाच्या पाण्यावर अवलंबून होता. तालुक्याचा अर्धा भाग खडकवासला कालव्याच्या पाण्यावर, तर उर्वरित भाग उजनी धरणावर अवलंबून होता. गेल्या दहा वर्षांपूर्वीपर्यंत येथील शेतकरी सुखी होता. मात्र, त्यानंतर उजनी धरणाच्या पाण्याचा वापर इतर भागांत वाढल्याने इंदापूर तालुक्याला मोठा फटका बसला.

खडकवासला कालव्याच्या पाण्यालाही राजकीय दृष्टी लागल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. पाणी वितरण हे राजकीय सोयीनुसार होत असून त्यात इंदापूर तालुका भरडला जात असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. परिणामी, पाण्यासाठी शेतकरी आता पुण्यातील जलसंपदा विभागाच्या कार्यालयावर धडक देत असून, आंदोलनाचा इशाराही देत आहेत.

जलसंपदा विभागाच्या आकडेवारीनुसार इंदापूर तालुक्याला सर्वाधिक पाणीपुरवठा होत असल्याचे दाखवले जाते. त्याखालोखाल दौंड आणि हवेली तालुक्यांचा क्रमांक लागतो. प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी असल्याचा आरोप होत आहे. दौंड, बारामती आणि हवेली तालुक्यांना पुरेसे पाणी मिळत असताना इंदापूर तालुका मात्र कोरडाठाक राहत असल्याने तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. तरुण शेतकरी आक्रमक झाले असून, कागदोपत्री पाणी दाखवून प्रत्यक्षात पाणी न मिळाल्याचा आरोप ते करत आहेत. पाण्याच्या प्रश्नावरून तालुक्यातील राजकीय नेत्यांवरही टीका होत आहे. "मामा, भाऊ, भैय्या आणि दादा" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्थानिक नेत्यांनी एकत्र येऊन राजकीय ताकद वापरली, तर हा प्रश्न सुटू शकतो. मग तरीही तालुक्याला न्याय का मिळत नाही? असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. वेळीच पाण्याचा प्रश्न मार्गी लावला नाही, तर आंदोलन अधिक तीव्र होईल आणि त्याची राजकीय किंमत मोजावी लागेल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

---

## संकेत अस्वारे यांची पोलीस शिपाई पदावर निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** येथील संकेत संतोष अस्वारे यांची महाराष्ट्र पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई पोलीस दलातील पोलीस शिपाई पदासाठी निवड झाली असून, पहिल्याच प्रयत्नात त्यांनी हे यश संपादन केल्याने पारगाव पंचक्रोशीत त्यांचे कौतुक होत आहे.

मुंबई पोलीस भरतीची निवड यादी नुकतीच प्रसिद्ध झाली. त्यामध्ये संकेत अस्वारे यांची निवड झाल्याचे जाहीर होताच गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यानिमित्त माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांच्या हस्ते संकेत यांचा पेढा भरवून सत्कार करण्यात आला. यावेळी संकेत यांच्या आई संगीता संतोष अस्वारे, वडील संतोष अस्वारे, रोहिदास लोंढे, प्रशांत अस्वारे, आदित्य अस्वारे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

संकेत यांचे प्राथमिक शिक्षण पारगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. त्यानंतर त्यांनी श्री संगमेश्वर महाविद्यालयात माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. पुढे दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील शिक्षण संस्थेत पदवी शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी पोलीस भरतीची तयारी सुरू ठेवली. परिश्रम आणि अभ्यासाच्या जोरावर पहिल्याच प्रयत्नात पोलीस भरती परीक्षेत यश मिळवले. त्यांच्या या यशाबद्दल ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## सारांश वृत्त

### वीज आणि वादळात तीन जणांचा बळी

**भुवनेश्वरः** ओडिशामध्ये गेल्या २४ तासांत वीज कोसळून आणि वादळी पावसामुळे किमान तीन जणांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी गुरुवारी दिली. बुधवारी दुपार आणि संध्याकाळी मयूरभंज, केओंझार आणि अंगुल जिल्ह्यांमध्ये सोसाट्याचा वारा, मेघगर्जना आणि विजांचा कडकडाट झाला, ज्यात तीन जणांचा मृत्यू झाला, अशी माहिती विशेष मदत आयुक्त (एसआरसी) कार्यालयाच्या एका अधिकाऱ्याने दिली.

### बेकायदेशीर कॉल सेंटरचा पर्दाफाश

**पणजी** : दक्षिण गोव्यातील वेर्णा औद्योगिक वसाहतीमधून चालवले जाणारे एक अवैध कॉल सेंटर पोलिसांनी उद्ध्वस्त केले असून, बँकेचे कर्मचारी असल्याचे भासवून अमेरिकी नागरिकांची फसवणूक केल्याप्रकरणी २६ जणांना अटक केली आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिली. मिळालेल्या माहितीच्या आधारे, २८ मे रोजी पहाटे वेर्णा येथील एका फॅक्टरी हबवर छापा टाकण्यात आला, जिथे हा बेकायदेशीर अड्डा कार्यरत असल्याचे आढळून आले, असे त्यांनी सांगितले. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आरोपींनी इंटरनेट-आधारित कॉलिंग प्रणालीद्वारे अमेरिकेतील बँकांचे अधिकारी असल्याचे भासवून अमेरिकन नागरिकांना लक्ष्य केले. त्यांनी पीडितांना गिफ्ट कार्ड्सच्या माध्यमातून पैसे हस्तांतरित करण्यास भाग पाडले.

### हत्तीच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू

**इरोड (तामिळनाडू)** : या जिल्ह्यात शुक्रवारी एका जंगली हत्तीने चिरडून एका ४० वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांच्या माहितीनुसार, एप्पाथंपलायम वनग्रामचा रहिवासी असलेला पीडित थंगराज नैसर्गिक विधीसाठी बाहेर गेला असताना एका नर हत्तीने हल्ला करून त्याला जागीच ठार केले. त्याचा आक्रोश ऐकून कुटुंबीय आणि शेजारी घटनास्थळी धावून आले आणि त्यांनी वन व पोलीस अधिकाऱ्यांना माहिती दिली. ते थोड्याच वेळात पोहोचले आणि त्यांनी त्याच्या मृत्यूची पुष्टी केली.

## एसआयआर निकालावर काँग्रेसची टीका

# न्यायालयाच्या निर्णयाने प्रश्न अधिक वाढले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेसने बुधवारी मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेवरील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर तीव्र आक्षेप घेत अनेक विसंगती असल्याचा दावा केला. पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि खासदार अभिषेक मनु सिंघवी यांनी हा निकाल उत्तरे देण्याऐवजी अधिक प्रश्न निर्माण करणारा असल्याचे म्हटले.

दिल्लीतील पक्ष मुख्यालयात पत्रकार परिषदेत बोलताना सिंघवी म्हणाले की, "प्रश्न निवडणूक आयोगाला एसआयआर राबवण्याचा अधिकार आहे की नाही हा नव्हता. प्रश्न हा होता की ही प्रक्रिया ज्या प्रकारे, ज्या घाईत आणि ज्या पद्धतीने राबवली गेली, त्यामुळे न्यायाचा अभाव आणि नागरिकांच्या अधिकारांचे उल्लंघन झाले."



बुधवारी सकाळी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात भारतीय निवडणूक आयोगाला एसआयआर प्रक्रिया राबवण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट केले होते. न्यायालयाने म्हटले की, ही प्रक्रिया मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांशी थेट संबंधित आहे आणि त्यात कोणत्याही वैधानिक अथवा घटनात्मक तरतुदींचे उल्लंघन झालेले नाही. मात्र, सिंघवी यांनी निकालातील परिच्छेद १७१ चा उल्लेख करत सांगितले की, नागरिकत्वाबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाकडे नसून तो गृह मंत्रालयासारख्या सक्षम प्राधिकरणाकडे आहे. "जर नागरिकत्वाचा अंतिम निर्णय आयोग घेऊ शकत नसेल, तर कोट्यवधी लोकांची नावे मतदार याद्यांतून कशी वगळण्यात आली?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यांच्या मते, अनेक राज्यांमध्ये सुमारे साडेसात कोटी लोकांना नागरिकत्वाशी संबंधित कारणांवरून यादीतून वगळण्यात आले. "हा स्पष्ट विरोधाभास असून सर्वोच्च न्यायालयाने त्याची अधिक गंभीर दखल घ्यायला हवी होती," असे ते म्हणाले.

सिंघवी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशातील परिच्छेद ९७ ते १०० यांचा दाखला देत निवडणूक आयोगाच्या त्रुटी, चुका आणि उणिवांचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, राजकीय पक्ष आणि स्वयंसेवी संस्थांच्या याचिकांमुळेच आयोगाला आधार कार्ड मंजूर कागदपत्रांच्या यादीत समाविष्ट करावे लागले तसेच वगळलेल्या ६५ लाख मतदारांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी लागली.

"जर आयोगाने नंतर या सुधारणा केल्या, तर त्या सुरुवातीपासूनच का लागू केल्या नाहीत?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

काँग्रेस नेत्यांनी एसआयआर प्रक्रियेच्या वेळापत्रकावरही प्रश्न उपस्थित केले. "बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये कोट्यवधी मतदारांसाठी ही प्रक्रिया अवघ्या काही महिन्यांत पूर्ण करण्यात आली. पुढील निवडणुका लक्षात घेता ही प्रक्रिया वर्षभर आधी का सुरू करण्यात आली नाही?" असा सवाल त्यांनी केला. आधी मतदारांची नावे वगळली गेली आणि नंतर त्यावर निर्णय घेतला गेला. "नावे वगळणे आणि अंतिम निर्णय यामधील काळात निवडणुका झाल्या, तर मतदानाच्या हक्कांचे मोठे उल्लंघन होऊ शकते," असे त्यांनी नमूद केले.

ते म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने आधार कार्ड, रेशन कार्ड यांसारखी कागदपत्रे नागरिकत्वाचा पुरावा नसल्याचे योग्यरीत्या म्हटले; मात्र, निवडणूक आयोगाने याच कागदपत्रांच्या आधारे लाखो लोकांची नावे वगळली. "हा विरोधाभास न्यायालयाने अधिक कठोरपणे अधोरेखित करायला हवा होता," असे त्यांनी सांगितले.

## दहशतवादाविरोधात दुहेरी मापदंड नकोत : डोवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अजित डोवाल यांनी गुरुवारी रशियातील मॉस्को येथे आयोजित सुरक्षा परिषदेला संबोधित करताना दहशतवादाविरोधातील जागतिक लढ्यात कोणताही "दुहेरी मापदंड" स्वीकारता येणार नाही, असा ठाम संदेश दिला.

उच्चस्तरीय आंतरराष्ट्रीय सुरक्षा मंचावर बोलताना डोवाल यांनी दहशतवाद हा संपूर्ण जगासाठी समान धोका असल्याचे स्पष्ट केले. "दहशतवाद कुठूनही येवो आणि त्याला कोणीही पाठिंबा देवो, तो दहशतवादच असतो," असे सांगत त्यांनी दहशतवादाविरोधात एकसमान आणि कठोर धोरणाची गरज अधोरेखित केली.

भारताने अनेक वर्षे सीमापार दहशतवादाचा सामना केला असल्याचा उल्लेख करत त्यांनी आंतरराष्ट्रीय समुदायाला शून्य-सहिष्णुता धोरण स्वीकारण्याचे आवाहन केले. दहशतवादी कारवायांना आर्थिक पाठबळ रोखण्यासाठी समन्वित



उपाययोजना, गुप्तचर माहितीची देवाणघेवाण आणि दहशतवादाचा राज्यकारभाराचे साधन म्हणून वापर करणाऱ्या देशांविरोधात कठोर कारवाई करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

पश्चिम आशियातील वाढते तणाव, कट्टरतावाद आणि जागतिक सुरक्षेसमोरील नव्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर डोवाल यांचे वक्तव्य महत्त्वपूर्ण मानले जात आहे. त्यांनी रशियाच्या जागतिक सुरक्षा विषयक भूमिकेचे कौतुक करत भारत-रशिया सामरिक भागीदारी अधिक मजबूत असल्याचा पुनरुच्चार केला. परिषदेत विविध देशांतील वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले असून, उदयोन्मुख सुरक्षा धोके, बहुध्रुवीय जागतिक व्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यांसारख्या विषयांवर चर्चा करण्यात आली.

## विविध इथेनॉल मिश्रित पेट्रोलचे पर्याय?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशभरातील पेट्रोल पंपांवर वाहनमालकांना लवकरच इंजिनच्या अनुकूलतेनुसार विविध प्रकारचे इथेनॉलमिश्रित पेट्रोल निवडण्याची सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता आहे. ई-२०, ई-२२, ई-२५ आणि ई-३० अशा प्रकारांमध्ये हे इंधन उपलब्ध करून देण्याचा विचार केंद्र सरकारकडून सुरू असल्याची माहिती सरकारी सूत्रांनी दिली.

सरकारने इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्थान पेट्रोलियम या सरकारी तेल कंपन्यांसह जिओ-बीपी, नायरा




एनर्जी आणि शेल यांसारख्या खासगी इंधन विक्रेत्यांना त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याच्या सूचना दिल्या आहेत. एप्रिल महिन्यात केंद्र सरकारने पूर्णपणे इथेनॉलवर चालणाऱ्या वाहनांना परवानगी देण्याचा प्रस्ताव मांडल्यानंतर या प्रक्रियेला गती मिळाली आहे. इंधन केंद्रांवर उपलब्ध असलेल्या इथेनॉल मिश्रित पेट्रोलची माहिती ग्राहकांना स्पष्टपणे दिसेल अशा पद्धतीने प्रदर्शित करावी लागणार आहे. त्यामुळे वाहनचालकांना त्यांच्या वाहनासाठी योग्य इंधन निवडणे सोपे होणार आहे.

पश्चिम आशियातील सुरू असलेल्या भू-राजकीय संघर्षामुळे जागतिक ऊर्जा सुरक्षेबाबत चिंता वाढली आहे. भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा कच्चे तेल आयात करणारा देश असल्याने पर्यायी इंधन वापर वाढविण्यावर सरकार भर देत आहे. मार्च २०२६ पर्यंत भारताने सुमारे २० अब्ज लिटर इथेनॉल उत्पादन केले आहे. सध्याच्या २० टक्के इथेनॉल मिश्रणाच्या अनिवार्य धोरणासाठी ११ अब्ज लिटर इथेनॉलची आवश्यकता आहे.

## देशभरातील शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने यंदाच्या मान्सूनचा अंदाज कमी केल्याने देशभरातील शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे. मध्यपूर्वेतील युद्धामुळे वाढलेल्या शेती खर्चाचा सामना करत असताना कमी पावसाचा इशारा मिळाल्याने कृषी उत्पादन, अन्नसुरक्षा आणि देशाच्या आर्थिक विकासावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गेल्या तीन वर्षांतील हा सर्वात कमकुवत मान्सून ठरण्याचा अंदाज असल्याने परिस्थिती अधिक गंभीर मानली जात आहे.

भारतासारख्या कृषिप्रधान देशासाठी मान्सून हा अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. देशातील शेती, जलाशय आणि भूजल पातळी मोठ्या प्रमाणात पावसावर अवलंबून आहे. मान्सूनमधून देशाला आवश्यक असलेल्या पाण्यापैकी सुमारे ७० टक्के पाणी मिळते. अशा परिस्थितीत कमी पावसाचा अंदाज आणि त्याचवेळी वाढती डिझेल दरवाढ यामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत.

विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम. रविचंद्रन यांनी दिलेल्या माहितीनुसार, जून ते सप्टेंबर या कालावधीत यंदा दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ९० टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. यामध्ये ४ टक्के कमी-जास्त होऊ शकते. यापूर्वी एप्रिल महिन्यात हवामान विभागाने ९२ टक्के पावसाचा अंदाज व्यक्त केला होता. मात्र, एल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण घटण्याची शक्यता वाढली आहे.

भारतीय हवामान विभागाच्या निकषांनुसार, गेल्या ५० वर्षांतील ८७ सेंटीमीटर सरासरी पर्जन्यमानाच्या ९६ ते १०४ टक्के पाऊस 'सामान्य' मानला जातो. यंदाचा अंदाज ९० टक्क्यांवर आल्याने हा मान्सून 'सामान्यपेक्षा कमी' श्रेणीत गेला आहे.

भारत हा तांदूळ, साखर आणि कापूस उत्पादनात जगातील आघाडीच्या देशांपैकी एक आहे. लाखो शेतकरी पेरणी आणि सिंचनासाठी पूर्णपणे मान्सूनवर अवलंबून असतात. चार महिन्यांच्या पावसाळ्यात देशाच्या वार्षिक पावसाचा मोठा हिस्सा मिळतो. कमी पावसामुळे पिकांचे नुकसान होण्याची भीती वाढली आहे.

कमी पाऊस आणि वाढती महागाई यामुळे अन्नधान्य उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत सरकारला अन्नसुरक्षा राखण्यासाठी कृषी उत्पादनांच्या निर्यातीवर निर्बंध घालावे लागू शकतात. याच पार्श्वभूमीवर सरकारने साखरेच्या निर्यातीवर ३० सप्टेंबरपर्यंत बंदी लागू केली आहे.

## भारतात लवकरच प्लास्टिक चलनी नोटा वापरात?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारतात लवकरच प्लास्टिक अर्थात पॉलिमर चलनी नोटा चलनात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वाढती रोकड मागणी, कागदी नोटांच्या छपाईवरील वाढता खर्च आणि मोठ्या प्रमाणावर खराब होणाऱ्या नोटा लक्षात घेऊन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दशकभरापूर्वीचा पॉलिमर नोटांचा प्रस्ताव पुन्हा सक्रिय केला आहे. यासाठी लवकरच पायलट प्रकल्प जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, आरबीआयच्या पाटणा आणि मुंबई येथे झालेल्या अलीकडील संचालक मंडळ बैठकीत पॉलिमर नोटांचा विषय चर्चिला गेला. सध्या वापरात असलेल्या कागदी नोटांच्या तुलनेत पॉलिमर नोटा अधिक टिकाऊ असून त्यांची उत्पादन किंमत तुलनेने कमी पडते. तसेच त्या लवकर खराब होत नाहीत आणि बनावट नोटांवर नियंत्रण ठेवण्यासही मदत होते. बँकेशी संबंधित सूत्रांनी सांगितले की, "पॉलिमर नोटांच्या छपाईचा खर्च तुलनेने कमी आहे. तसेच एटीएम यंत्रणाही या नोटा सहज ओळखू शकतील, अशी तांत्रिक तयारी आता उपलब्ध झाली आहे."

रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक अहवालानुसार, २०२४-२५ या आर्थिक वर्षात सुरक्षित कागदी नोटा छापण्यासाठी तब्बल ६,३७२.८ कोटी रुपयांचा खर्च झाला. मागील आर्थिक वर्षात हा खर्च ५,१०१.४ कोटी रुपये होता.

दरम्यान, खराब व फाटलेल्या नोटांचे प्रमाणही सातत्याने वाढत आहे. २०२४-२५ मध्ये तब्बल २३.८ अब्ज खराब नोटा बाद करण्यात आल्या, जे मागील वर्षाच्या तुलनेत १२.३ टक्क्यांनी अधिक आहे. यामध्ये ५०० रुपयांच्या नोटांचे प्रमाण सर्वाधिक असून त्यानंतर १०० रुपयांच्या नोटांचा क्रमांक लागतो.

## तीन महिन्यांत निर्णय देणे बंधनकारक

# निकाल राखून ठेवण्यावर कठोर निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** निकाल दीर्घकाळ राखून ठेवल्यामुळे पक्षकारांचे कधीही भरून न येणारे नुकसान होते, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने देशातील सर्व उच्च न्यायालयांना महत्त्वपूर्ण निर्देश जारी केले आहेत. निकाल राखून ठेवल्यानंतर तीन महिन्यांच्या आत तो जाहीर करणे आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी म्हटले.



सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने वैयक्तिक स्वातंत्र्याशी संबंधित प्रकरणांमध्ये तातडीने निर्णय देण्याची गरज अधोरेखित केली. विशेषतः जामीन अर्जांवर शक्यतो त्याच दिवशी निर्णय देण्यात यावा, असे न्यायालयाने नमूद केले.

खंडपीठाने स्पष्ट केले की, जर आदेश राखून ठेवण्यात आला असेल तर त्याची घोषणा करून तो आदेश पुढील दिवसापर्यंत संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच जामीन मंजूर करणारे किंवा शिक्षा स्थगित करणारे आदेश तात्काळ तुरुंग प्रशासनाला कळवले जावेत, जेणेकरून विचाराधीन आरोपी किंवा दोषी व्यक्तीची शक्यतो त्याच दिवशी किंवा उशिरात उशिरा दुसऱ्या दिवशी सुटका करता येईल.

सर्वोच्च न्यायालयाने संविधानाच्या अनुच्छेद १४२ अंतर्गत असाधारण अधिकारांचा वापर करत म्हटले की, जर केवळ निकालाचा कार्यकारी भाग जाहीर करण्यात आला असेल, तर त्यामागील सविस्तर कारणांसह संपूर्ण निकाल १५ दिवसांच्या आत अपलोड करणे बंधनकारक असेल.

न्यायालयाने निर्देश दिले की, निकाल राखून ठेवल्यानंतर चार महिन्यांच्या आत तो जाहीर न झाल्यास संबंधित पक्षकारांना उच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांकडे जाऊन ते प्रकरण दुसऱ्या खंडपीठाकडे वर्ग करण्याची मागणी करता येईल. याशिवाय, खुल्या न्यायालयात सकारण निकाल दिल्यानंतर तो २४ तासांच्या आत न्यायालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

दरम्यान, या निर्देशांचा उद्देश कोणत्याही विशिष्ट न्यायाधीशावर किंवा उच्च न्यायालयाच्या निर्णयप्रक्रियेवर टीका करणे नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

## सीजेपीचे एक्स खाते अनब्लॉक करण्यास नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयने शुक्रवारी व्यंग्यात्मक ऑनलाइन प्लॅटफॉर्म 'कॉकरोच जनता पार्टी' (सीजेपी) चे एक्स खाते तात्पुरते अनब्लॉक करण्याचे निर्देश देण्यास नकार दिला. मात्र, माहिती तंत्रज्ञान नियमांनुसार पुनर्विलोकन समितीने या प्रकरणाची तपासणी करून ७ जुलैपर्यंत निर्णय घ्यावा, असे निर्देश न्यायालयाने दिले.

न्यायमूर्ती पुरुषेंद्र कुमार कौरव यांनी या प्रकरणाची सुनावणी करताना सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांना समितीसमोर व्हर्च्युअली हजर राहण्याची परवानगी दिली. खाते ब्लॉक करण्याचा निर्णय मागे घेणे आवश्यक असल्याचे समितीच्या निदर्शनास आले, तर संबंधित एक्स खाते अनब्लॉक करण्याचा अधिकार समितीकडे असल्याचे न्यायालयाने नमूद केले. हँडल ब्लॉक केल्याप्रकरणी दीपके यांनी दाखल केलेल्या याचिकेवर केंद्र सरकार आणि एक्स यांना नोटीस बजावण्यात आली असून, त्यांचे उत्तर मागवण्यात आले आहे. पुढील सुनावणी ७ जुलै रोजी होणार आहे. "पुढील सुनावणीपूर्वी पुनर्विलोकन समितीने सर्व बाबींची तपासणी करावी आणि निर्णय नोंदीवर ठेवावा," असे न्यायालयाने आदेशात म्हटले आहे. दीपके यांच्या वतीने ज्येष्ठ वकील अखिल सिब्बल यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, सीजेपी हे खाते "पूर्णपणे उपहासात्मक" स्वरूपाचे होते. काही ट्विट्स आक्षेपार्ह वाटत असतील, तर संपूर्ण खाते बंद करण्याऐवजी केवळ संबंधित ट्विट्सवर कारवाई केली जाऊ शकते, असे त्यांनी न्यायालयात मांडले. त्यांनी अंतरिम निर्बंध हटवण्याची मागणी करताना ब्लॉकिंग आदेशाची प्रत उपलब्ध करून देण्याची विनंतीही केली. मात्र, न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, संबंधित आदेश अद्याप न्यायालयाच्या नोंदीवर उपलब्ध नाही आणि केंद्र सरकारचे उत्तर आल्यानंतरच याचिकाकर्त्याच्या मागणीवर विचार केला जाईल.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने नमूद केले की, ब्लॉकिंगविषयक कायदा अद्याप प्राथमिक अवस्थेत आहे आणि घाईघाईने निर्णय देणे योग्य ठरणार नाही. त्याचवेळी, याचिकाकर्त्याला पुनर्विलोकन समितीसमोर आपली बाजू मांडण्याची मुभा देण्यात आली.

## काँग्रेस विधिमंडळ पक्षाची आज बैठक

**बंगळूर :** कर्नाटक काँग्रेस विधिमंडळ पक्षाची बैठक ३० मे रोजी बोलावण्यात आली असून, नवीन नेत्याची निवड होणार आहे. विधिमंडळ पक्षाचे सचिव अल्लमप्रभू पाटील यांनी आमदारांना पाठवलेल्या पत्रानुसार, विधान सौध येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये शनिवारी दुपारी ४ वाजता बैठक होणार आहे. सिद्धरामय्या यांचा मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा स्वीकारून त्यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ बरखास्त केल्यानंतर ही घडामोड झाली आहे.

## इस्रायलप्रश्नी काँग्रेसचा हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** इस्रायलविषयक भारताच्या भूमिकेवरून काँग्रेसने शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली. मोदी यांची भूमिका ही भारताच्या मूल्यांशी केलेला "विश्वासघात" असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

वेस्ट बँकमधील एका परिषदेत इस्रायलचे पंतप्रधान बेन्जामिन नेतान्याहू यांनी "भारताचा अपवाद वगळता" जगभरात इस्रायलला अवैध ठरवले जात असल्याचे वक्तव्य केल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने ही टीका केली. काँग्रेसचे महासचिव जयराम रमेश यांनी एक्सवरील पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला. इराणच्या राष्ट्रप्रमुखांच्या कथित हत्येपासून ते गाझामधील संघर्षापर्यंत इस्रायलच्या कारवायांचा निषेध करण्यात मोदी अपयशी ठरल्याचा आरोप त्यांनी केला. "मोदी हे नेतान्याहूंचे सर्वात मोठे समर्थक म्हणून समोर आले आहेत. इस्रायल हा मोडानी समूहाचा अविभाज्य भाग आहे. ते अत्यंत नैतिक भ्याडपणा दाखवत आहेत आणि त्यांची भूमिका ही भारताच्या सर्व मूल्यांशी केलेला विश्वासघात आहे. हे लज्जास्पद आणि कोट्यवधी भारतीयांसाठी अस्वीकार्य आहे," असे रमेश यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले.

नेतान्याहू यांच्या कथित वक्तव्यांवर प्रश्न उपस्थित करत रमेश म्हणाले की, हे संपूर्ण भारताच्या भावनांचे प्रतिनिधित्व करत नाही. "हे संपूर्ण भारताविषयी न म्हणता पंतप्रधान मोदींच्या परिसंस्थेविषयी म्हणणे अधिक अचूक ठरले असते," असेही त्यांनी नमूद केले.


## निती आयोगाचा १० वर्षांचा व्यापक आराखडा

# सेमीकंडक्टर क्षेत्रातील जागतिक केंद्राच्या दिशेने...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** नीती आयोगाने २०३५ पर्यंत १२० ते १५० अब्ज डॉलर्सची सेमीकंडक्टर मूल्य साखळी उभारण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य निश्चित केले असून, भारताला जागतिक चिप परिसंस्थेत अपरिहार्य स्थान मिळवून देण्यासाठी दहा वर्षांचा व्यापक आराखडा सादर केला आहे.

भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आणि तांत्रिक सार्वभौमत्व मजबूत करण्याच्या उद्देशाने नीती आयोगाच्या फ्रंटियर टेक हबने मे २०२६ मध्ये "भारताच्या सेमीकंडक्टर उद्योगाचे



भविष्य" हा धोरणात्मक अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात भारताला केवळ सेमीकंडक्टरचा ग्राहक न ठेवता जागतिक मूल्य साखळीतील महत्त्वपूर्ण उत्पादन आणि डिझाइन केंद्र बनवण्याची रणनीती मांडण्यात आली आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ मध्ये जाहीर झालेल्या 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन २.०' नंतर हा रोडमॅप सादर करण्यात आला असून, परिसंस्था उभारणीपासून उत्पादन क्षमता विस्ताराकडे देश वाटचाल करीत असल्याचे यातून स्पष्ट होत आहे.

अत्याधुनिक फाउंड्री नोड्समध्ये थेट स्पर्धा करण्याऐवजी भारताने 'मोअर-दॅन-मूर' धोरण स्वीकारावे, अशी शिफारस या अहवालात करण्यात आली आहे. यात चिप डिझाइनमधील भारताची ताकद वापरत उच्च-वाढीच्या विशेष विभागांवर लक्ष केंद्रित करण्यावर भर देण्यात आला आहे.

अहवालानुसार, २०३५ पर्यंत भारत जागतिक सेमीकंडक्टर बाजारपेठेत १० ते १३ टक्के हिस्सा मिळवू शकतो. तसेच जवळपास २०० अब्ज डॉलर्सच्या देशांतर्गत बाजारपेठेला आधार देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सेमीकंडक्टर मागणीतील ३५ ते ५० टक्के स्वयंपूर्णता आणि स्थानिक डिझाइन, पॅकेजिंग व मटेरियल इकोसिस्टमद्वारे ५५ ते ७० टक्के मूल्य देशातच निर्माण करण्याचे लक्ष्य आहे.

भारताने आउटसोर्स्ड सेमीकंडक्टर असेंब्ली अँड टेस्ट आणि प्रगत पॅकेजिंगमध्ये जगातील पहिल्या तीन प्रमुख केंद्रांमध्ये स्थान मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम कम्प्युटिंग आणि उच्च-कार्यक्षमता कम्प्युटिंगसाठी चिप डिझाइन क्षेत्रात १०० हून अधिक प्रगत बौद्धिक संपदा विकसित करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

नीती आयोगाचे उपाध्यक्ष अशोक कुमार लाहिरी यांनी आयातीत तंत्रज्ञानावरील वाढते अवलंबित्व हे 'विकसित भारत' संकल्पनेसाठी धोरणात्मक धोका असल्याचे सांगितले. तांत्रिक सार्वभौमत्वासाठी पायाभूत तंत्रज्ञान क्षेत्रात स्वावलंबन आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

'पायोनियरिंग' विभागात इलेक्ट्रॉनिक डिझाइन ऑटोमेशन (ईडीए) साधनांसाठी अनुदान, राष्ट्रीय डिझाइन आणि पॅकेजिंग सह-डिझाइन प्लॅटफॉर्म आणि कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित चिप डिझाइन मोहीम यांसारख्या उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

धोरण आणि गुंतवणूक विभागात पुढील दशकात १३५ ते १८० अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची गरज व्यक्त करण्यात आली आहे. यासाठी सरकारने ४५ ते ६० अब्ज डॉलर्सचा स्वतंत्र सेमीकंडक्टर सपोर्ट फंड उभारून खासगी गुंतवणूक आकर्षित करावी, अशी शिफारस आहे. उत्पादन धोरणांतर्गत भारताने २८ नॅनोमीटर ते ६५ नॅनोमीटर लॉजिक नोड्स तसेच ऑटोमोबाईल, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि पॉवर मॅनेजमेंट क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या विशेष ॲनालॉग चिप्सवर लक्ष केंद्रित करण्याचे नियोजन केले आहे.